दै. लोकपत्र दि 18/07/2024

# हिमायतनगर येथील बलात्कार प्रकरणांतील आरोपींना तेलंगणातून अटक; हिमायतनगर पोलिसांची स्तुत्य कामगिरी

**हिमायतनगर/ता.प्रतिनिधी**

शहरातील एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेऊन तिच्यावर जबरी बलात्कार करून फरार झालेल्या आरोपीस अखेर हिमायतनगर पोलीसांनी बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई तेलंगणा राज्यातील निर्मल गाजूलपेठ येथे नुकतीच करण्यात आली आहे.

हिमायतनगर शहरातील एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेऊन तिच्यावर बलात्कार करण्यात आला. हि घटना जवळपास आठ महिन्यापुर्वी घडली. हिमायतनगर पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्याअंतर्गत मुख्य आरोपी इम्रान खान, माजीद खान वय २३ वर्ष, व त्याचा साथीदार अब्दूल रहमान शेख चांद पाशा वय १८ वर्ष दोघे रा. हिमायतनगर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हापासून या गुन्ह्यातील आरोपी हे फरार होते. अखेर पोलीसांना या आरोपींचा शोध घेण्यास यश आले आहे. गुप्त माहितीच्या आधारे तेलंगणा राज्यातील



या गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली. परंतु आरोपीस अटक करण्यात आल्यानंतर पहावयास मुलगी जिवंत राहीली नाही. सदरील मुलगी ही आरोपी सोबत लंग्न करण्याचा हट्ट धरू लागल्याने बदनामीच्या पोटी आई वडीलानींच पाच महिन्यांपूर्वीच तिचा काटा काढला हे इथे विशेष.

निर्मल जवळील गाजूलपेठ भागांतून आरोपीस ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, पोलीस निरीक्षक अमोल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नामदेव मद्दे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्रीमती कोमल कांगणे, पोलीस नायक श्याम नागरगोजे यांनी केली. उशिराने का होईना पोलीसांनी केलेल्या कारवाईचे येथे कौतुक होत असून आरोपीस न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.